निवडसूची सन २०१३-१४.
पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन आदेश क्र.रापोसे-०११४/प्र.क्र.२१३/पोल-१(अ)
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ फेब्रुवारी, २०१६.

वाचा :- पोलीस आस्थापना मंडळ क्र.१ यांनी चक्रीय पध्दतीने केलेली शिफारस.

शासन आदेश :-

पोलीस उप अधीक्षक / सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या पदावर पदोन्नती देण्यासाठी तयार करण्यात आलेल्या सन २०१३-१४ च्या निवडसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षक संवर्गातील खालील अधिकाऱ्याची त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी पदोन्नतीने पदस्थापना करण्यात येत आहे :-

अ.क्र.	अधिकाऱ्याचे नांव	सध्याच्या नियुक्तीचे ठिकाण	नवीन नियुक्तीचे ठिकाण
१	श्री. राकेश चंद्रनाथ शर्मा	पोलीस निरीक्षक, बृहन्मुंबई	अपर उप आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई.

२. उपरोक्त अधिकाऱ्याविरूध्द विभागीय / संक्षिप्त / प्राथमिक चौकशी / न्यायालयीन कार्यवाही प्रलंबित / प्रस्तावित असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दि. २ एप्रिल, १९७६ च्या परिपत्रकामधील तरतुदीनुसार, त्यांच्याविरूध्द प्रलंबित / प्रस्तावित / संक्षिप्त / प्राथमिक चौकशीअंती त्यांना शिक्षा झाल्यास, सदर शिक्षा ते पदोन्नतीच्या पदावर भोगण्यास तयार असल्याचे हमीपत्र त्यांच्याकडून घेऊनच त्यांना पदोन्नतीने पदस्थापना देण्यात यावी.

३. उपरोक्त पदोन्नती मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल याचिका क्र.२७९७/२००४ व याचिका क्र.४७०/२००५ मधील अंतिम निर्णयाच्या, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मान्यतेच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

४. पदोन्नतीने पदस्थापना देण्यता आलेल्या पदावर मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण अथवा अन्य मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश असल्यास, ते विचारात घेऊन उपरोक्त अधिकाऱ्यास पदस्थापना देण्यात यावी.

५. उपरोक्त अधिकाऱ्यास सध्याच्या पदावरुन कार्यमुक्त करून, त्यांना पदोन्नतीच्या पदावर रूजू होण्यासाठी, महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी आवश्यक कार्यवाही करावी.

६. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०२०२१४०९५२०१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Charushila Chandrakant Tambekar

Digitally signed by Charushila Chandrakant Tambekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Joint Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=2b0496c0c213a3f50c6522cc39ae5de95e1150ac3287e89c21b1422e313820a2, cn=Charushila Chandrakant Tambekar
Date: 2016.02.22 16:47:50 +05'30'

(चारूशीला तांबेकर)
सह सचिव, गृह विभाग.

प्रति,

महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

प्रत :-

१) महालेखापाल-१(लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. राज्यमंत्री (गृह) (शहरे/ग्रामिण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
५) प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
६) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) पोलीस आयुक्त, बृहन्मुबई,
८) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, मुंबई,
९) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१०) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
११) संबंधित अधिकारी (पोलीस महासंचालक यांचेमार्फत),
१२) निवडनस्ती / पोल-१(अ).